# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २८४/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. अशोक भा.जाबरे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी (वसाहत) के/पूर्व,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुंबई -४०० ०६९

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुंबई -४०० ०६९

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.०६.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मुमाआ नों.क्र. ४१५९/२०१८ अपील क्र. १५३५/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. २१.१२.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश अंशत: मान्य करुन असे आदेशीत करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. १ बाबतची माहिती एस.आर.ए. कडून प्राप्त करुन अपिलार्थी यांना १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."*

२. उक्त आदेशाच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांनी माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे दि. १७.०८.२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. ३०.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी (वसाहत) के/पूर्व, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त के/ पूर्व विभाग यांचे कार्यालय, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी (वसाहत) के/पूर्व, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त के/ पूर्व विभाग यांचे कार्यालय, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्याकडून आयोगास दि. १४.०६.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २२.०६.२०२६ आयोगाच्या निदर्शनास आणून नमुद केले की, राज्य माहिती आयोगाचे निर्णयाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

४. आयोगाच्या अभिलेखावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता यांचे मूळ माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ खालीलप्रमाणे होता:-

*"मनपा विभागाकडे झोपडपट्टी बायोमेट्रिक सर्वेक्षणाच्या कामांची शासकीय संपूर्ण नियमावलीच्या पुस्तिकेची उपलब्ध आपणाकडे असलेली प्रत मिळावी."*

५. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, आयोगाच्या आदेशानंतर त्यांनी दि.१२.०२.२०२० व १५.१२.२०२० रोजी मुख्य समन्वयक अधिकारी, बायोमेट्रीक कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे, मुंबई यांच्याकडे सदर मुद्याच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. परंतु, माहिती प्राप्त झाली नाही व सदर पत्राची प्रत तक्रारकर्ता यांना देण्यात आलेली आहे.

६. जन माहिती अधिकारी यांनी असेही सादर केले की, सदर माहिती आता ऑनलाईन उपलब्ध आहे. आयोगाने सुनावणी काही वेळेसाठी तहकुब करुन जन माहिती अधिकारी यांना सदर माहितीची ऑनलाईन प्रिंट काढण्यास सांगितले. सुनावणी पुन्हा सुरु झाली असता तक्रारकर्ता अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केले की, ते ऑनलाईन माहिती उपलब्धतेबाबत आयोगासमोर अनावधानाने बोलले आहेत.

७. जन माहिती अधिकारी यांनी बायोमेट्रीक कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण या कार्यालयातून माहिती प्राप्त करण्यासाठी वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १३.०७.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

25-6-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २५.०६.२०२६**

**रामाआ - तक्रार क्र. बीएम - २८४/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. अशोक भा. जाबरे**

**सुनावणी दिनांक : १३.०७.२०२६ (In continuation of order dt २५.०६.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी बायोमेट्रीक कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण या कार्यालयातून माहिती प्राप्त करण्यासठी वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, आयोगाचे आदेश दि. २१.१२.२०१९ प्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून बायोमेट्रीक सर्वेक्षण नियमावलीची प्रत प्राप्त करुन घेतलेली आहे व त्यांनी सदर माहिती आयोगास सादर केली. त्यांनी आयोगास पुढे सादर केले की, तक्रारकर्ता यांना दि.१३.०७.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती पोस्टाने पाठविलेली आहे.

३. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

15-7-2026

(डॉ. प्रदीप व्यास)

**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**

**दिनांक : १५.०७.२०२६**